# तलत मेहमूद - भाग ६



**प्रश्न -** तलत साब, तुम्हाला माहीत आहे का की मेहदी हसनने 'हुस्नवालों को ना दिल दो' हे तुमचे गाणे एका खासगी समारंभात म्हटले आणि फक्त ह्या एकाच गाण्यासाठी त्याला २०,००० पाकिस्तानी रुपयांची बिदागी मिळाली आणि त्यानंतर त्याने गाण्यांचा अगदी मनापासून अभ्यास केला.

**तलत महमूद -** हो, हो, हे मी ऐकले होते पण गाणे कोणते हे नक्की माहीत नव्हते.

**प्रश्न -** सध्यां तुम्ही तुमचा वेळ कसा घालवता?

**तलत महमूद -** टीव्ही वरचे कांहीं कार्यक्रम पाहून, कैंव्हातरी मित्रांशी गप्पा मारून नाहीतर गच्चीवर समुद्राचा देखावा पहात वेळ जातो.

**प्रश्न -** हो, विचारायचं राहूनच गेलं! तुम्हा दोघांची भेट कशी आणि कुठे झाली? अर्थातच तुमचे लव्ह मॅरेज आहे कारण तलत बंगाली आहे तर तुम्ही उत्तर प्रदेशातून आलाय.

**सौ. तलत -** मी कलकत्त्याला असतानाच त्याची चाहती होते. त्याचा आवाज मला खूप आवडायचा. तसेच मी 'न्यू थिएटर'च्या 'काशिनाथ' ह्या चित्रपटात बालकलाकार म्हणून कामही केले होते. त्यामुळे चित्रपटसृष्टीशी माझा थोडाफार संबंधही होता.

**प्रश्न -** हो पण तुमच्या ह्या प्रेमामुळे तलतचे इतर फॅन अर्थातच महिला वर्ग नाराज झाला असणार!

**सौ. तलत -** कैंव्हाही! उनकी तो छुट्टी कर दी! त्यानंतर १९५१ मध्ये मुंबईत आमचा विवाह झाला.

**प्रश्न -** तलत साब, तुमचे सर्वात आवडते कवी कोण?

**तलत -** (पटकन म्हणाले) ग़ालिब

**प्रश्न -** ग़ालिब बद्दल प्रश्नच नाही पण माझा रोख वेगळा होता. मला विचारायचे होते की हिंदी चित्रपटसृष्टीतील कोणता गीतकार तुम्हाला आवडतो?

**खालिद म्हणाला,** "खूप जण आवडतात. सगळे चांगले गीतकार नक्कीच आवडतात."

**प्रश्न -** आणि संगीतकार कोणते आवडतात?

**खलिद म्हणाला,** "मदन मोहन, खय्याम" ...

**तलत महमूद -** "सलिल चौधरी आणि अनिल विश्वास विसरलास कां?"

**प्रश्न -** तलत, तुम्ही के. एल. सैगलचे भक्त होता हे आम्हाला माहीतच आहे पण तुम्हाला गायन शिकण्यासाठी प्रोत्साहित केले, प्रेरणा दिली ती तुमची आत्या कोण?

**खलिद -** त्यांच्या वडिलांची बहीण.

**तलत मेहमूद -** मेहलका बेगम.

**प्रश्न -** असं कुठलं गाणं तुम्हाला आठवतं कां की नंतर तुम्हाला वाटलं की अरे उगाच मी ते गाणं गायलो!

**तलत मेहमूद -** छे छे कुठलेच नाही.

**प्रश्न -** दुसऱ्या कुणीतरी म्हटलेले गाणे मला मिळालं असतं तर बरं झालं असतं असं कधी तलत ना वाटलं आहे कां ? खलिद , तुला कांहीं माहीत आहे कां ?

**खलिद -** नाही, असं काही नाही पण मुकेशनी गायलेले 'कहीं दूर जब दिन ढल जाये' हे गाणं त्यांना खूप आवडायचं.

**प्रश्न -** त्यांच्या खाजगी कार्यक्रमात त्यांच्या सर्वात आवडीचं असं कोणतं गाणं ते सादर करीत असत?

**खलिद -** 'ज़िंदगी देनेवाले सुन' हे आहेच शिवाय 'प्यारपर बस तो नहीं है' आणि 'जलते हैं जिसके लिये' ही गाणी पण त्यांच्या आवडीची होती.

**प्रश्न -** तलत साब, 'जलते हैं जिसके लिये' ह्या गाण्याचे गीतकार मजरूह सुलतानपुरी मला एकदा म्हणाले होते की तलतने तर ह्या गाण्यात कमाल केली. "तलत मेहमूदने तो कमाल ही कर दिया!"

वायफळ बडबड न करणाऱ्या ह्या गीतकाराच्या शाबासकीने विनम्र होऊन तलत आपले डोळे तृप्तीने मिटून घेतो.

मी माझ्या ह्या पुस्तकाचे काम कुठवर आले याबाबतची त्याला माहिती दिल्यावर त्याने "नक्कीच ते योग्य दिशेने पूर्ण करशील" अशा अर्थाने समाधानाने मान डोलावली.

तलतच्या घरून बाहेर निघताना मला भरून आले होते. परंतु आता अंधार झाला होता आणि सूर्य बहुदा बऱ्याच वेळापूर्वी मावळला असावा. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी त्याच्या गाण्यांची कॅसेट मी ऐकत बसलो होतो. 'शिकस्त' मधील 'सपनों की सुहानी दुनियाको' पासून सुरु झालेली ही गाणी नंतर 'बाज़' मधील 'मुझे देखो हसरत की तस्वीर हूँ मैं' आणि 'वारिस' मधील 'कभी है ग़म कभी खुशियां, यही तो ज़िंदगानी है' अशी एक से बढकर एक गाणी ऐकतच गेलो. मनात तलतचेच विचार घोळत होते. तो आतां काय करीत असेल? माझ्या मनांत आले की तो गच्चीवर चिमण्यांची चिवचिव ऐकत त्यामध्ये संगीत शोधत असेल कां ? कदाचित मावळत्या सूर्याकडे पहात 'कहीं दूर जब दिन ढल जाये' असे स्वतःशीच गुणगुणत असेल! आपल्या ओघवत्या गोड वाणीमुळे आम्हांला नैराश्यातून बाहेर काढण्याचे ज्याने काम केले तो गुणी गायक स्वतःलाच व्यक्त करू शकत नव्हता. त्याच्या त्या मृदू, संस्कारित आवाजाने आम्हांला जे अमाप सुख दिलं त्याबद्दल कृतज्ञता म्हणून त्यांचे दुःख दूर करण्याचे सामर्थ्य आम्हांला मिळाले असते तर किती बरे झाले असते !

९ मे १९९८ रोजी तलत मेहमूद पैगंबरवासी झाला.

(समाप्त)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून.)

**NOTE:** Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No

matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com